# PER BOARD – 2 EXAMINATION (2025-26)

## MARATHI

Class : X
Date : 19.12.2025
Admission No.:

**SET -A**

Duration : 3 Hrs
Max. Marks : 80
Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

**(1) या प्रश्नपत्रिकेत अ, ब, क, ड असे चार विभाग आहेत.**
**(2) सर्व विभाग आवश्यक आहेत.**
**(3) यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.**
**(4) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.**

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अः अपठित गद्यांश :–**

संत साहित्यामध्ये ज्यांचा वारंवार उल्लेख आढळतो,ते दोन पक्षी म्हणजे चातक आणि चकोर. दोन्ही पक्ष्यांमध्ये एक समान दुवा आहे तो म्हणजे वाट पाहणे. चातक पक्षी पावसाळी ढगाची वाट पाहतो,तर चकोर पौर्णिमेच्या चंद्राची वाट पाहतो. चकोर पक्षी पौर्णिमेच्या चंद्रकिरणांवर जगतो असा कविसंकेत आहे. चंद्राबद्दलची त्याची ओढ प्रसिध्द आहे. संतकाव्यात चकोराची उपमा देऊन संत परमेश्वराबद्दलची त्यांची ओढ व्यक्त करतात. हा चकोर पक्षी खरोखरच चंद्रकिरण खातो का? याचे उत्तर नाही असेच येते. मुळात प्रकाश ही खाण्याची किंवा पिण्याची गोष्ट नाहीच.

काही पक्षी संशोधकांनी केलेल्या संशोधनात हे स्पष्ट झाले आहे,की चकोर पक्षी रात्रीच्या वेळी आपले अन्न मिळविण्यासाठी बाहेर पडतो. चांदण्या रात्री तो आपले भक्ष्य म्हणजे कीडे,कीटक चोच वर करून पकडण्याचा प्रयत्न करतो.त्याची ही कृती कवीमनाला चांदणे पिण्यासारखी वाटली असू शकेल. पारंपारिक कथांनुसार चातक पक्षी स्वाती नक्षत्रातील पावसाचे जमिनीवर न पडलेले पाणी वरच्यावर पितो आणि आपली तहान भागवतो. एखादयावर आपले जीवन अवलंबून असणे किंवा एखादयाची वाट पाहणे यासाठी चातक आणि चकोराची उपमा दिली जाते.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडाः–(कोणतेही पाच)** **(5X1=5)**

1 कोणत्या साहित्यात पक्ष्यांचा उल्लेख आला आहे ?

**अ** संत　　**ब** पंत
**क** गदय　　**ड** पदय

2 चातक पक्षी कशाची वाट पाहतो?

**अ** पाण्याची　　**ब** आकाशाची
**क** पावसाळी ढगांची　　**ड** पावसाळी गारांची

3 चकोर पक्षी कशाची वाट पाहतो?

**अ** सूर्यकिरणांची　　**ब** मेघाची
**क** अन्नाची　　**ड** चंद्रकिरणांची

4 संतांच्या मनात कोणाबद्दल ओढ असते?

**अ** आई **ब** परमेश्वर

**क** देवालय **ड** ग्रथसंपदा

**5** चकोर पक्षी अन्न मिळविण्यासाठी केव्हा बाहेर पडतो?

**अ** दुपारी **ब** सायंकाळी

**क** पहाटे **ड** रात्री

**6** संतसाहित्यामध्ये कोणत्या दोन पक्ष्यांचा उल्लेख आला आहे?

**अ** चातक व चकोर **ब** हंस व बगळा

**क** चिमणी व कावळा **ड** कबूतर व कोकिळा

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

**1** चातक आणि चकोराची उपमा कोणाला दिली आहे?

**2** पारंपारिक कथांनुसार चातक पक्ष्याबाबत कोणता समज आहे?

**3** चकोर पक्ष्याबाबत कोणता कविसंकेत आहे?

**4** चकोर पक्षी आपले भक्ष कसे पकडण्याचा प्रयत्न करतो?

**प्र 2 (आकलन ) अपठित पद्यांश :–**

**प्र 2 (अ) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई
तिच्या राहावे ऋणात होऊ नये उतराई
तिच्या एकेका शब्दाला रत्न कांचनाचे मोल
कधी तप्त लोहापरी कधी चांदणे शीतल
रानवाऱ्याच्या गंधात माझी मराठी भिजली
लेऊनिया नाना बोली विविध माझी मराठी सजली
माझ्या भाषेचे अमृत प्राशेल तो भाग्यवंत
तिचा नाही दुजाभाव असो कोणताही पंथ
माझ्या मराठी भाषेची काय वर्णावी थोरवी
दूर देशी ऐकू येते माझ्या मराठीची ओवी

**प्र 2 (अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडाः–(चार) (4X1=4)**

**1** कवीने कोणत्या गोष्टीची तुलना आईशी केली आहे?

**अ** देशाशी **ब** भाषेशी

**क** निसर्गाशी **ड** ज्ञानाशी

**2** कवीच्या भाषेत शब्दांचे मोल कशासारखे आहे?

**अ** सोन्यासारखे **ब** रत्न–कांचनासारखे

**क** पैशासारखे **ड** मोत्यासारखे

**3** मराठी भाषेत कोणते घटक मिळून सजले आहेत?

**अ** विविध ऋतू **ब** नाना बोली

**क** अनेक पंक्ती **ड** विविध रंग

**4** मराठी भाषेचे अमृत प्राशन करणारा कोण ठरतो?

**अ** ज्ञानी **ब** श्रीमंत

**क** भाग्यवंत **ड** पराक्रमी

**5** मराठी भाषा कोणत्या गंधात भिजली आहे ?

**अ** रानवाऱ्याच्या　　　　**ब** उन्हांच्या

**क** पावसाच्या　　　　**ड** हिवाळयाच्या

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** मराठी भाषेची थोरवी कोठे ऐकू येते?

**2** मराठी भाषेचा चांदण्यासारखा कोणता गुण कवितेत नमूद केला आहे?

**3** कवितेनुसार मराठी भाषा कोणत्या प्रकारचे ज्ञान देते?

**4** कवीने मराठी भाषेला कोणत्या स्वरूपात गौरविले आहे?

5 उपकार या शब्दासाठी कवितेत आलेला समानार्थी शब्द शोधून लिहा.

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

**1** प्रत्येकामध्ये प्रामाणिकपणा असावा. ( भाववाचक नाम ओळखा)

**2** मी,तू,आम्ही,मला या शब्दांना व्याकरणातील शब्द जातीत काय म्हणतात.

**3** आई बाबांचे आपल्या<u>वर</u> फार उपकार आहेत. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**4** विदयार्थी वर्गात आले आणि शिक्षकांनी शिकवण्यास सुरुवात केली. (उभयान्वयी अव्यय ओळखा)

**5** कोकिळा <u>मधुर</u> गाते. ( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** शबरीने रामाच्या पायाचे ठसे पाहिले होते.( वर्तमानकाळातील वाक्य तयार करा).

**2** नीता दिलेले काम पूर्ण करेन. ( भूतकाळातील वाक्य तयार करा)

**3** राम दररोज ग्रंथालयात जात असे. ( भविष्यकाळातील वाक्य तयार करा )

**4** ते फार प्रसिद्ध व्यावसायिक होते.(काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** तू खेळ खेळायला पाहिजे. ( आज्ञार्थी वाक्यात रुपांतर करा)

**2** त्याच्या बोलण्यात असत्यता नव्हती.( होकारार्थी वाक्यात रुपांतर करा )

**3** मला तो चित्रपट आवडला. ( वाक्य प्रकार ओळखा)

**4** केवढा मोठा आहे तुझा आवाका! ( विधानार्थी वाक्यात रुपांतर करा)

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

**1** फूल　　　　**2** कुसुम

**3** पुष्प　　　　**4** कळी

**2** **कुतूहल** शब्दासाठी समानार्थी शब्द लिहा.

**3** खालील पैकी समानार्थी शब्दाची जोडी ओळखा.

**अ** दृष्टी–नजर　　　　**ब** जगणे–मरणे

**क** पाऊस–वादळ　　　　**ड** पुसट–स्पष्ट

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** दाट ×　　　　2 आकर्षण ×　　　　3 आस्था ×

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** खालील पैकी पुल्लिंगी शब्द कोणता?

अ स्त्री　　　　ब विनंती

क कोलाहल　　　　ड कला

2 **नायक** या शब्दासाठी स्त्रीलिंगी शब्द कोणता?

3 खालील पैकी पुल्लिगी शब्द कोणता?

अ पृथ्वी　　　　ब प्रेम

क पंखा　　　　ड देऊळ

**प्र 4 (क) वचन बदला　( कोणतेही दोन)　(2X1=2)**

1 खालील पैकी अनेकवचनी शब्द कोणता ?

अ तबला　　　　ब डोळा

क ताट　　　　ड फेटे

2 खालील पैकी एकवचनी शब्द कोणता ?

अ घरे　　　　ब झोपडया

क फेटे　　　　ड किल्ला

3 **खेडे, वेडे,झाडे,वाडे** – या शब्दांपैकी एकवचनी शब्द ओळखा.

**प्र 4 (ड) समास ओळखा　( कोणतेही दोन)　(2X1=2)**

1 **त्रिकोण–** या समासाचा योग्य विग्रह ओळखा.

अ तीनगट　　　　ब त्रिकोण वगैरे

क तीन कोणांचा समूह　　　　ड तीन आणि कोण

2 खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

अ एकवीस　　　　ब यशापयश

क पापपुण्य　　　　ड खरेखोटे

3 त्याने भाजीपाला खरेदी केला. ( अधोरेखित शब्दाचा समास ओळखा)

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा　(कोणतेही तीन)　(3X1=3)**

1 अब्दुल कोणत्या दोन दिवशी तपोवनात जात असे?

2 माशेलकरांचे वडील वयाच्या कितव्या वर्षी वारले?

3 रेखामावशीला सायकल कोणी घेऊन दिली?

4 लेखकाला बटाटा सोडण्याचा सल्ला कोणी दिला?

5 सभा संमेलने गाजवणारे कवी कोण होते?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भराः–　(कोणतेही तीन)　(3X1=3)**

1 मी ––– साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो.

2 ना तिकीट, ना व्हिसा, ना बस, ना –––––– मी कुठेही जाऊ शकतो.

3 बांगडया भरल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अब्दुलला ––– वाटे.

4 भिंगाच्या साहायाने–––– शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं

5 भुकेल्यास अन्न दयावे,तहानलेल्यास पाणी दयावे, आणि तेही जमले नाही,तर ––– सन्मानाच्या शाली　　　　तरी दयाव्यात.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः–　(1X3=3)**

1 निरंजनच खरा नागरिक हे तुमच्या शब्दात लिहा –

2 पंतांच्या उपासाबाबत त्याच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दात वर्णन करा.

3 माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान या विषयावर तुमचे विचार लिहा–

**प्र 5 ङः–खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचाराशी जुळतो ते लिहाः–** **(5X1=5)**

**(खूप आनंद वाटणे, रिकामा वेळ न मिळणे, निपुण असणे, प्रभावित होणे,नाराजगी व्यक्त करणे,प्रेमाने जवळ घेणे)**

1 असं म्हणून गुरुजींनी निरंजला हृदयाशी धरले.

2 ज्ञानपीठ पुरस्कार ययाति या कादंबरीला मिळाला, तेव्हा मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरुन आला.

3 बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दल आपली मळमळ व्यक्त केली.

4 मला काही कामामुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही,

5 वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले.

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

1 संतवाणी या अभंगाचे संपादक कोण आहेत?

2 दोन दिवस ही कविता कोणत्या कवितासंग्रहातून घेतली आहे?

3 डोळे भरुन पाहावे असे दृश्य कोणते?

4 हस्त कसा असावा?

5 घराघरांतून कोण जन्म घेत आहे?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 सवेंचि झेंपावें –––

2 अशा –––– ज्योतींची तुझ्यामागून राखण.

3 नव्या पिढीचे, नव्या –––– स्वप्न करु साकार.

4 कधी माना उंचावलेले तर कधी ––– झालेले हात.

5 फुलामुलांतून हसतो–––– मातीचे हो मंगल तनमन.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक)** **(1X3=3)**

1 नामा म्हणे मेघा जैसा
विनविती चातक तैसा ।।

**किंवा**

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे नव्या युगाचे स्वप्न करु साकार ।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही पाच )** **(5X1=5)**

1 लेखक ट्रेनिंग स्कूलला गेले तेव्हा संस्थेला किती वर्षे पूर्ण झाले होते ?

2 ताकास तूर न लागू देणे म्हणजे काय ?

3 डॉ. काकोडकरांनी किती वर्षांपूर्वीचे अनुभव सांगितले आहे ?

4 व्युत्पत्ती म्हणजे काय?

5 अत्तर या मराठी शब्दाला अरबी भाषेत काय म्हणतात?

6 मराठी उत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन कोणत्या साली झाले?

**विभाग– ड लेखन– (गुण 15)**

**लेखन**

**प्र 8 (अ) दिलेले निबंध मुद्दे व कथा मुद्दे नीट वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर 120 ते150 शब्दांत निबंध अथवा कथा लिहा :– (कोणतेही एक) (1X5=5)**

**निबंधविषयक मुद्दे**

**1 शालीची आत्मकथा**

मुद्दे:–प्रवासात थंडी–––अंगावर शाल–––शाल बोलत होती––– शालिची निर्मिती कोठे व कधी–––तुझ्या बाबांच्या सत्कारामुळे घरी आले–––आता जीर्ण––– तुझी आई मला जपायची–––तुझ्याकडे आले ––– आता तू माझी काळजी घे.

**2 शास्त्रज्ञ झालो तर ......!**

**मुद्दे :–** आजचे युग विज्ञानाचे युग––विज्ञानाचे चमत्कार पाहून मनात विचार–– मी शास्त्रज्ञ झालो तर––विज्ञानाचे उच्च शिक्षण घेईल––वैज्ञानिक संस्थांची निर्मिती करेल–––सर्व गोष्टी,औषधे,वस्तू देशात बनविणे––प्रयोगशाळेत देशाला उपयुक्त गोष्टींवर काम करेल––– माझा शोध सर्व मानवाच्या कल्याणासाठी.

**3 आवडता ऋतू**

**मुद्दे :–**आवडत्या ऋतूचे नाव––कोणत्या महिन्यात असतो–––वातावरणात त्यामुळे होणारे बदल––तुम्हाला आवडण्याची कारणे

**किंवा**

**कथाविषयक मुद्दे. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)**

1 एक व्यापारी––खूप पैसे घेऊन गावी निघतो––वाटेत चोर––दोघे रात्री धर्मशाळेत थांबतात––चोर रात्री व्यापाऱ्याच्या पिशव्या तपासतो––काहीही मिळत नाही––व्यापाऱ्याची युक्ती––व्यापारी चोराच्या उशीखाली पैसे ठेवतो––चोर दुसऱ्या दिवशी चकित––– निराश––तात्पर्य .

2 एक फुलांचे गाव –– एक दगडांचे गाव–– दगडांना फुलांचा राग––फुलांचीच स्तुती––दगडांना किंमतच नाही––एकदा दोन्ही गावात भांडण––फुलांवर हल्ला––फुले ठेचली जातात––तरी त्यांचे हास्य––दगडांना आश्चर्य–– फुलांचे उत्तर–– जितके अधिक चिरडता तितका सुगंध पसरतो––तात्पर्य.

**प्र 8 (ब) पत्र लेखन :– ( लिफाफा आवश्यक) ( कोणतेही एक ) (1X5=5)**

संतोष/संतोषी काळे,लक्ष्मीनगर, सातारा येथील सार्वजनिक उदयानातील दुरावस्थेबाबत तक्रार करणारे पत्र व्यवस्थापक,उदयानविभाग, सातारा यांना लिहितो/लिहिते.

**किंवा**

जीवन/जिया पाटील, विदयार्थी प्रतिनिधी,रमणबाग प्रशाला,गंगापूर रोड, नाशिक या शाळेला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याने शाळेची सजावट करायची असून त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र मा. व्यवस्थापक,देविका सजावट भांडार,मदिना चौक, रेणुकानगर, नाशिक यांना लिहितो/लिहिते.

**प्र 8 (क)खालील दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन करा:– (1X5=5)**

1 भ्रमणध्वनी सेंटरच्या दुकानाची जाहिरात तयार करा –

2 पुस्तकाच्या दुकानाची जाहिरात तयार करा :–

=================== **"यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा"** ====================